पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/०१/२०२२** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती** ची पाक्षिक सभा **शुक्रवार,** दिनांक **२१/०१/२०२२** रोजी दुपारी **३.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पद्धतीने व्हिडिओ) कॉन्फरन्सिंग द्वारे( आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.कोमल दिपक मेवानी
४. मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
५. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.चव्हाण - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) मा.विधी समिती सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०४**) दि.०७/०१/२०२२ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २१/०१/२०२२ विभाग - इ क्षेत्रिय विद्युत

सुचक - मा.सुनिता तापकीर अनुमोदक - मा.कोमल मेवानी

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/वि/०३/२०२२, दि. ०५/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

जुने भोसरी हॉस्पीटल येथील स्ट्रेचर लिफ्ट १२ वर्ष जुनी झाली असुन वांरवार नादुरुस्त होत आहे. तसेच लिफ्ट शाफ्टमध्ये पाण्याचे लिकेज असल्यामुळे लिफ्ट कार केबीनचे गंजुन नुकसान झाले आहे. हॉस्पीटलमध्ये पहील्या व दुसऱ्या मजल्यावर महीला प्रसुतीगृह ओ.पी.डी. व वॉर्ड असलेने सदर लिफ्टचा वापर मोठ्या प्रमाणात होत असुन लिफ्ट अद्यावत व अखंडीतपणे चालु ठेवणेसाठी नविन लिफ्ट बसविणेचे कामाचे आदेश दि.१४/०६/२०२१ रोजी मे.फोनिक्स इलेव्हेटर प्रा.लि.,पुणे यांना देणेत आले आहेत. तथापि जुने भोसरी हॉस्पीटल इमारत जुनी झाली असल्याने निष्कासीत करणेत येणार आहे. तथापि प्रभाग क्र.७ भोसरी गावठाण पी.सी.एम.टी.चौक येथे उभारणी होत असलेल्या बहुउद्देशीय इमारतीमध्ये तत्सम नविन लिफ्ट उभारणी करणे आवश्यक असल्याने विषयांकीत काम रद्द करण्याएवजी बहुउद्देशीय इमारतीमध्ये नविन लिफ्ट बसविणेचे काम करणेस सक्षम समितीची मान्यता घेऊन काम करणे शक्य आहे व मनपाच्या सोईचे आहे. सदर बहुउद्देशीय इमारतीमधील विद्युतीकरणाच्या कामाचे आदेश निर्गत करणेत आले आहेत, परंतु त्यामध्ये लिफ्ट बसविणेच्या कामाचा समावेश नाही. तरी प्रभाग क्र.७ भोसरीमधील जुने भोसरी हॉस्पीटल इमारत निष्कासीत होणार असलेने याठिकाणी नविन लिफ्ट बसविणेएवजी याच प्रभागातील नव्याने तयार होत असलेल्या बहुउद्देशीय इमारतीमध्ये नविन लिफ्ट बसविणेचे काम निविदाधारक मे.फोनिक्स इलेव्हेटर प्रा.लि.,पुणे यांचेकडुन (निविदा क्रमांक ३४/०५ -- २०२०/२१, निविदा र.रु.२४,३७,४०४/--, कामाचा दर १०.१% कमी ) करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/२८/२०२२
दिनांक : २१/०१/२०२२

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.